# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 09/02/2018 (शुक्रवार)
# (दुपार)

---

## ट्रक चोरी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 7 कि. मी. अंतरावर मिरा मारोती शॉप वायगाव घोटुर्ली येथे दिनांक 07/02/2018 चे 18.00 वाजता ते दिनांक 08/02/2018 चे 04.45 अनोळखी आरोपीने फिर्यादी नामे– आदील बादशाह खान, वय 27 वर्ष, रा. वेकोली उमरेड याचा ट्रक क्र. एमएच–43/व्ही– 3560 किं. 7,50,000/– रू. चा चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री. गुलाब धुर्वे हे करीत आहे.

## दुखापत करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 02 किमी. अंतरावर वार्ड नं. 1 खापरखेडा येथे दिनांक 08/02/2018 चे 18.00 वा. ते 18.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विनोद दादा राऊत, वय 34 वर्ष, रा. खापरखेडा हा आपले सासुकडे ठेवलेले पैसे मागण्याकरीता गेला असता फिर्यादीचा साळा आरोपी नामे– रंजित रामप्यारे वानखेडे, वय 34 वर्ष, रा. खापरखेडा याने, ''पैसे का मागीतले?'' या कारणावरून फिर्यादीला शिवीगाळ करून भांडण करून काठीने त्याचे डोक्यावर मारून जखमी केले

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक श्रीमती मिना बारंगे या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर